# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५

E-mail contact@aurangabadmahapalika.org,
est1@aurangabadmahapalika.org

जा.क्र.मनपा/साप्र(आस्था-१)/२०२५/११६७ दिनांक- २१ /०७ /२०२५.

**सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.**

**- : जाहिरात : -**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दिनांक १० जून २०२५ नुसार खालील विवक्षित कामांसाठी शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधितांना ज्या कामासाठी अर्ज करावयाचा त्या कामाचा उल्लेख करुन आवश्यक कागदपत्रांसह दि.२५/०७/२०२५ पर्यंत लेखी अर्ज "सामान्य प्रशासन विभाग,मुख्य प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका" येथे दाखल करावेत. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहील.

| अक्र | विवक्षित कामाचे स्वरुप | अर्हता | संख्या |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य विभागातील औषध भांडार, मॅटर्निटी होम सुरु करणे, मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करणे व आरोग्य रुग्णालयाची सिव्हील कामे करणे तसेच आरोग्य केंद्रातील इतर कामे | अ) वैद्यकीय पदव्युत्तर पदवी (M.D. (P.S.M.) / M.D. वैद्यकीय पदव्युत्तर पदवी. पदव्युत्तर पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास, पदवीधारक (MBBS).<br>ब) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक.<br>क) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| २ | छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी महानगर पालिकेतर्फे समन्वयक म्हणून काम करणे, शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडी पासून शहरापर्यंतची योजनेची कामामध्ये समन्वयन करणे,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणी पुरवठ्याशी संबंधित विविध कार्यालयांशी समन्वय साधणे, मा.उच्च न्यायालयातील प्रकरणासंदर्भात उपस्थित राहून आवश्यक ती कार्यवाही करणे | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) किंवा उपअभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| ३ | शहरासाठी मलनि:सारण वाहिन्यांचे विशेष प्रकल्प या संदर्भातील पर्यवेक्षण विशेष प्रकल्प या संदर्भातील पर्यवेक्षण व देखभाल करणे तसेच या योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करणे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) किंवा उपअभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| ४ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सुधारित विकास योजनेमधील विविध विकास योजना रस्ते, आरक्षणे इत्यादीचे भूसंपादन प्रस्तावावर कार्यवाही करणे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) उपअभियंता (स्थापत्य)/सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | ०१ |

..२..

| अक्र | विवक्षित कामाचे स्वरुप | अर्हता | संख्या |
|---|---|---|---|
| ५ | महानगरपालिकेच्या हद्दीतील मंजूर रेखांकनातील खुल्या जागा व अंतर्गत रस्ते महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर महानगरपालिकेच्या नावे सातबाऱ्यावर नोंद करुन घेणे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) सहाय्यक नगररचनाकार/सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| ६ | शहर अभियंता विभागांतर्गत मंजूर रेखांकनातील स्वयं विकास पध्दतीने काम करणे (Self Development) साठी स्थापित एक खिडकी योजनेची कामे करणे, विभागातील प्रशासकीय कामे करणे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) उपअभियंता (स्थापत्य)/सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| ७ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेअंतर्गत शासन अनुदान रस्ते प्रकल्प विभागामार्फत शहर व शहरालगत ४७ विकास योजना रस्त्याचे सिमेंट कॉक्रीट इ. कामे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) उपअभियंता (स्थापत्य)/सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ०१ |

**<u>सर्वसाधारण अटी</u> :-**

१. उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी वरील नमूद केलेली अर्हता व संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात येत आहे. (अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ)

२. विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतू नियुक्तीस वाढीव कालावधीकरिता मुदतवाढ द्यावयाचे झाल्यास एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

३. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरणे नसावे याबाबत त्यांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे,त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घेऊन सादर करणे बंधनकारक राहील.

४. क्षेत्रीय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास हे कार्यालय बांधिल राहणार नाही.

५. सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

६. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

७. असा सेवानिवृत्त अधिकारी वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

८. असा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

९. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.

१०. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल. तसेच सदर नेमणूका करार पध्दतीने असून सदरील नेमणुकीमुळे कायम सेवेचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. तथा या आशयाची मागणी राहणार नाही,असे हमीपत्र अधिकाऱ्याने सादर करणे बंधनकारक राहील.

११. अशा अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबत संबंधित कार्यालयीन विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

..३..

| अ.क्र | विवक्षित कामाचे स्वरुप | अर्हता | संख्या |
|---|---|---|---|
| ५ | महानगरपालिकेच्या हद्दीतील मंजूर रेखांकनातील खुल्या जागा व अंतर्गत रस्ते महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर महानगरपालिकेच्या नावे सातबाऱ्यावर नोंद करुन घेणे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) सहाय्यक नगररचनाकार/सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| ६ | शहर अभियंता विभागांतर्गत मंजूर रेखांकनातील स्वयं विकास पध्दतीने काम करणे (Self Development) साठी स्थापित एक खिडकी योजनेची कामे करणे, विभागातील प्रशासकीय कामे करणे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) उपअभियंता (स्थापत्य)/सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| ७ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेअंतर्गत शासन अनुदान रस्ते प्रकल्प विभागामार्फत शहर व शहरालगत ४७ विकास योजना रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट इ. कामे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२) उपअभियंता (स्थापत्य)/सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ०१ |

**<u>सर्वसाधारण अटी</u> :-**

१. उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी वरील नमूद केलेली अर्हता व संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात येत आहे. (अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ)

२. विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतू नियुक्तीस वाढीव कालावधीकरिता मुदतवाढ द्यावयाचे झाल्यास एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

३. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरणे नसावे याबाबत त्यांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे,त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घेऊन सादर करणे बंधनकारक राहील.

४. क्षेत्रीय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास हे कार्यालय बांधिल राहणार नाही.

५. सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

६. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

७. असा सेवानिवृत्त अधिकारी वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

८. असा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

९. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.

१०. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल. तसेच सदर नेमणूका करार पध्दतीने असून सदरील नेमणुकीमुळे कायम सेवेचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. तथा या आशयाची मागणी राहणार नाही,असे हमीपत्र अधिकाऱ्याने सादर करणे बंधनकारक राहील.

११. अशा अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबत संबंधित कार्यालयीन विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१२. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१३. असा अधिकारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१४. अशा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१५. अशा अधिकाऱ्यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ते व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१६. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.

१८. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच महानगरपालिकेच्या गरजेनुसार आवश्यक कामे त्यांच्याकडे सोपवल्यास सदर कामे करणे बंधनकारक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

**मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेनुसार.**

अतिरिक्त आयुक्त-१
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

ठिकाण : - छत्रपती संभाजीनगर
दिनांक : -२१ /०७/२०२५